# जागतिक प्रार्थना दिन

## माहितीपूर्ण प्रार्थना - प्रार्थनापूर्वक कृती


## विषय : ‘‘या, मी तुम्हांला विश्रांति देईन.’’



## शुक्रवार, ६ मार्च २०२६

## नायजेरिया, जागतिक प्रार्थना समितीकृत

# मुखपृष्ठावरील चित्राचे स्पष्टीकरण

| | |
|---|---|
| ‘‘दमलेल्यासांठी विश्रांती’’<br><br>चित्रकार- गिफ्ट आमारा ओटाह<br> | ही कलाकृती सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत श्रम करणाऱ्या ग्रामीण महिलांच्या दैनंदिन वास्तवाचे चित्रण करते. एकत्र बसलेल्या तीन महिला विविध संस्कृतीमधून असून त्यांचे सामायिक अनुभव त्यांना एकत्र आणतात, कारण ते एकमेकींचे शारिरीक, भावनिक आणि आध्यात्मिक ओझे आणि आघात वाहून नेतात. जेव्हा त्यांचा थकवा ख्रिस्तांकडे आणतात आणि समुदायात एकमेकांना आधार देतात तेव्हा त्यांचे ओझे सहन करण्यायोग्य होते. |
| नायजेरियाचा ध्वज<br> | हिरवा रंग हिरवीगार शेती व कृषी संपत्तीचे प्रतिनिधीत्व करतो. पांढरा रंग शांति आणि एकतेचे प्रतिक आहे. १ ऑक्टोंबर १९६० रोजी नायजेरियाच्या स्वातंत्रदिनी हा ध्वज स्वीकारण्यात आला. |
| जागतिक प्रार्थना दिनाचे चिन्ह<br><br> | जागतीक प्रार्थना दिनाचे चिन्ह हे आयर्लंड येथील स्त्रियांनी सुरू केले व ते १९८२ मध्ये आंतरराष्ट्रीय चिन्ह म्हणून मान्य केले गेले. दरवर्षी मार्च महिन्यांच्या पहिल्या शुक्रवारी ही विशेष भक्ती महिला चालवतात. सर्व मंडळी उपासनेत सहभागी होत. १७० देशातील लोक यात भाग घेतात. ‘‘माहितीपूर्ण प्रार्थना- प्रार्थनापूर्वक कृती ’’ या ब्रीद वाक्याद्वारे ऐकमेकांशी वर्षभर संबंध प्रस्थापित करतात. |

पहिले प्रतिक- चारहि  दिशांकडून केंद्रभागी बाण दाखवले.
दुसरे प्रतिक- गुडघे टेकून प्रार्थना करणारी व्यक्ती
तिसरे प्रतिक- जगातील सर्व भाषिकांचे एकत्रिकरण.
चौथे प्रतिक- वर्तुळ म्हणजे जग.
पाचवे प्रतिक- यामध्ये वरील सर्व प्रतिक एकात एक गुंफलेली आहेत.

# नायजेरियाची ओळख

**नायजेरियाला अनेकदा 'आफ्रिकेतील महाकाय' म्हणून संबोधले जाते.**

**प्रजासत्ताक राज्य:- नायजेरिया, गिनीच्या आखातातील एक आफ्रिकन देश ज्याला १९६० मध्ये स्वातंत्र मिळाले आणि १९६३ मध्ये ते प्रजासत्ताक बनले. नायजेरिया हे राष्ट्रपती असलेले प्रजासत्ताक राज्य आहे. नायजेरियामध्ये ३६ राज्ये व अबुजा ही राजधनी असलेला संधराज्यीय प्रदेश आहे. नायजेरिया हा ब्रिटिश कॉमनवेल्थ चा सदस्य आहे.**

**स्थान: पश्चिम आफ्रिकेतील गिनीच्या आखातावर स्थित, उत्तरेला नायजर, पश्चिमेला बेनिन आणि पूर्वेला कामेरुन देश आहेत**

**राजधानी व शहरे: अबुजा (राजधानी), लागोस (सर्वात मोठे शहर)**

**लोकसंख्या : नायजेरिची लोकसंखेच्या अंदाचे २३.७ कोटी पेक्षा जास्त आहे. नायजेरिया हा आफ्रिकेतील सर्वाधिक लोकसंख्येचा व जगात सहाव्या क्रमांकावर आहे.**

**भाषा: येथे इंग्लिश ही अधिकृत भाषा आहे.**

**अर्थव्यवस्था: नायजेरियाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने खनिज तेल उत्पादनावर अवलंबून आहे .**

**धर्म: येथे उत्तरेकडे इस्लाम आणि दक्षिणेकडे ख्रिश्चन धर्माचे पालन केले जाते. हौसा, योरुबा आणि इग्बो हे प्रमुख वांशिक गट आहेत.**

**समाजव्यवस्था: नायजेरियामध्ये हौसा, योरुबा आणि इग्बो अश्या तीन प्रमुख जमाती आढळतात. या पैकी योरुबा आणि इग्बो जमातींमधील लोक ख्रिस्ती धर्माचे तर हौसा जमत प्रामुख्याने इस्लाम धर्माचे पालन करतात. ख्रिस्ती धार्मिक लोकांची संख्या पश्चिम आणि दक्षिणेत जास्त आहे. हौसा जमातीचे आणि इस्लामचे प्राबल्य उत्तर आणि पूर्व भागात आहे.**

**शेती व्यवसाय : नायजेरियात शेती हाच अर्थव्यवस्थेचा मुख्य पाया आहे. अन्नधान्याच्या बाबतीत हा देश बऱ्याच प्रमाणात स्वयंपूर्ण आहे. कोको, भुईमूग, कापूस, ताडतेल, रबर ही प्रमुख नगदी पिके आहेत. शेतीला पूरक असा येथे पशुपालन व्यवसाय केला जातो.**

**उद्योगधंदे : कथिल, खनिज तेल, कोलंबाईट ही खनिजे महत्वाची आहेत. लोखंड व पोलाद, सुती कापड व्यवसाय, हस्तव्यवसाय, कातडी वस्तू, हातमाग, भांडी, ताड तेलाच्या आणि शेंगदाणा तेलाच्या गिरण्या  हे येथील महत्त्वाचे व्यवसाय आहेत. त्या व्यतिरिक्त इतर उद्योगही वाढीस लागले आहेत.**

**सामाजिक आणि सुरक्षा आव्हाने:**

**अपहरणाच्या घटना: नायजेरियामध्ये, विशेषत: उत्तरेकडील भागात. बोको हरम सारख्या दहशतवादी गटांकडून शाळांमधील भागात, बोको हरम सारख्या दहशतवादी गटांकडून शाळांमधील मुलींचे अपहरण करणे ही एक गंभीर समस्या आहे. २०१४ मधील चिबॉक शाळेतील २७६ मुलींचे अपहरण ही मोठी घटना होती.**

**सुरक्षितता: १५०० हून अधिक मुले/विद्यार्थी २०१४ पासून शाळेतून अपहृत झाले आहेत, ज्यामुळे महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

**महिला जननेंद्रियांचे विच्छेदन (FGM): नायजेरियासह आफ्रिकेतील अनेक देशांमध्ये १५ वर्षांखालील मुलींवर FGM (Female Genital Mutilation) ची प्रथा पाळली जाते, जी मानवी हक्कांचे उल्लंघन आहे.**

**'मनी वाइफ' प्रथा: दक्षिण नायजेरियातील बेचवे समुदायात, कर्ज फेडण्यासाठी तरुण मुलींना वृद्ध पुरुषांशी लग्न करण्यास भाग पाडले जाते, ज्याला 'मनी वाइफ' (Money Marriage) प्रथा म्हटले जाते.**

**शिक्षण आणि सक्षमीकरण: सुशिक्षित मुली दारिद्र्यातून बाहेर पडू शकतात आणि शोषणापासून वाचू शकतात, म्हणून अमेरिकेसारखे देश नायजेरियातील मुलींच्या शिक्षणासाठी मदत करतात.**

**EndSars आंदोलन: नायजेरियाच्या इतिहासात महिलांनी त्यांच्या हक्कांसाठी लढा दिला आहे, ज्यामध्ये एंडसर्स (EndSarS) आंदोलनात महिलांचा मोठा सहभाग होता.**

**महिला संस्था: 'विमेन्स इम्पॅक्टिंग नायजेरिया' (WIN) सारख्या संस्था महिलांच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी काम करत आहेत.**

*********

# जागतिक प्रार्थना दिन

## नायजेरिया, जागतिक प्रार्थना दिन समिती कृत

## शुक्रवार ६ मार्च २०२६

## विषय: ''या, मी तुम्हाला विश्रांती देईन.''

# उपासनाक्रम

## हेतू :-

ही प्रार्थना सर्वांना देवाच्या जवळ येण्याचे आणि देवाच्या सानिध्यात विश्रांती घेण्याचे आवाहन करते.

जेव्हा आपण देवावर पूर्णपणे विश्वास ठेवतो तेव्हा आपले ओझे हलके होते. आपल्याला विश्रांती मिळते.

''या, मी तुम्हाला विश्रांती देईन.'' (मतय ११: २८- ३०) या विषयाला प्रतिसाद म्हणून ख्रिश्चन नायजेरियन महिला गटाने हा कार्यक्रम लिहीला आहे. आम्हांला आशा आहे की, जगातील सर्व महिलांना एकत्र येऊन प्रार्थना करण्यास आम्ही प्रेरित करू.

## पूर्वतयारी :-

➢ समोरील टेबल खालील प्रमाणे सजवावा.

❖ रंगीत आफ्रिकन कापड/गलिचा - हे नक्षीदार विणलेले कापड, पारंपारिक व नायजेरियन संस्कृतीच्या समृध्दतेचे प्रतिक आहे. ते नायजेरीयन लोकांच्या लवचिकता आणि सर्जनशीलतेचे प्रतिनिधित्व करतात. ते दैनंदिन जीवनात, सौंदर्य आणि अर्थ विणतात.

गुंतलेल्या धाग्यांप्रमाणे विविध कथा व साक्ष या, सामायिक मानवता आणि श्रध्देच्या विणीत गुंफल्या गेल्यात.

❖ नायजेरियन ध्वज :-

ध्वजातील हिरवा व पाढरा रंग विविधतेतील एकता आणि भविष्यातील आशेचे प्रतिक आहे. हे रंग आपल्याला देवाच्या निर्मितीचे आणि आपल्या समुदायांमध्ये शांतता निर्माण करणारे बनण्याच्या आव्हानाची आठवण करून देतात.

- **शोक व्यक्त करणारे वस्त्र /कापड :-**
  **बीट्रिसच्या कथेत वर्णत केलेल्या पध्दतशीर दडपशाहीच्या ओझ्याचे प्रतिनिधित्व करते.**
- **शाळेचे पाठीवरील दप्तर व पुस्तके :-**
  **शालेय मुलींना तोंड द्यावे लागणाऱ्या धार्मिक छळाच्या ओझ्याचे प्रतिक.**
- **तांदळाचे दाणे :- गरिबी आणि निराशेच्या परस्पर जोडलेल्या ओझ्यांचे प्रतीक आहे. जे आर्थिक अडचणी आणि मानसिक आरोग्य - संघर्ष यामधील संबंध अधोरेखित करतात.**
- **खडक किंवा दगड :- हे दगड वाहून नेणाऱ्या लोकांच्या डोक्यावरील जड ओझ्यांचे प्रतिनिधित्व करतात. जे गरिबी, अत्याचार व अन्याय यासारख्या संघर्षाचे प्रतीक आहेत. ते आपल्याला नायनेरियाच्या समृध्द खनिज संसाधनांची देखील आठवण करून देतात.**

  **हे दगड, ख्रिस्तामध्ये ओझे हलके करण्याच्या सकारात्मक बदलाच्या संधीमध्ये कसे रुपांतरित करू शकतात याचा विचार करण्यास सांगतात.**
- **ऑलिव्ह ऑइल (काचेच्या बाटलीत):- हे तेल नायजेरियाच्या कच्च्या तेलाच्या गुंतागुंतीच्या इतिहासाचे प्रतिक आहे. जे समृध्दीची क्षमता व जागतिक शोषणाचे वजन दोन्ही प्रतिबिंबित करते. ते आर्थिक विकास आणि पर्यावरणीय व्यवस्थापन यांच्यातील आव्हानात्मक संतुलनाचे प्रतिनिधित्व करते.**
- **मेणबत्या :- या ‘निराशेच्या सावटातही आशा’, ‘अंधारातून प्रकाशाचा मार्ग’, सध्या ज्या कठिण किंवा अप्रिय परिस्थितीत आहात त्याच्या समाप्तीच्या विश्वासाचे प्रतिक आहेत.**
- **भोपळ्या पासून बनविलेले वाडग :-**
  **नायजेरियातील शेतकरी स्त्रिया पिके गोळा करण्यासाठी आणि विकण्यासाठी याचा वापर करतात. जीवनाच्या संघर्षामध्ये देव कसा ‘पोषण’ आणि ‘ विश्रांती’ देतो याचे प्रतिक आहे.**

*************

# उपासनेसाठी आवाहन

**‘‘तरी परमेश्वराची आशा धरून राहणारे नवीन शक्ति संपादन करतील, ते गरूडाप्रमाणे पंखांनी वर उडतील, ते धावतील तरी दमणार नाहीत, चालतील तरी थकणार नाहीत. (यशया ४०:३१)**

## गीत: उपासनासंगीत क्रमांक ११७........कोण मित्र येशूवाणी

## सुरुवातीची प्रार्थना

**नेता: आपण प्रार्थना करू.**

**हे आमच्या प्रिय परमेश्वरा, आम्ही तुझे स्वागत करतो. ‘‘कारण, जेथे दोघे किंवा तिघे माझ्या नावाने जमले आहे तेथे, त्यांच्यामध्ये मी आहे’’ ह्या तुझ्या वचनावर विश्वास ठेवून आम्ही एकत्र जमलो आहोत.**

**तुझ्या उपस्थितीची प्रशंसा करतो.**

**‘तूं अल्फा आणि ओमेगा आहेस.’ ‘आरंभ आणि अंत तूच आहेस.’ ‘तू आमचे अस्तित्व व आधार आहेस.’ तुझ्यामध्येच आम्ही जीवन जगत आहोत. देवा तूं आमचे ओझे वाहतोस, तुझी स्तुती करतो, तुला धन्यवाद देतो. !**

**हे परमेश्वरा, तुझ्या पवित्र आत्म्याचा वर्षाव कर. आमची हृदय पवित्र आत्म्याने भर, तुझ्या पवित्र उपस्थितीचा अनुभव आम्हांला घडिव, आमचे ओझे वाहणाऱ्या, आम्ही तुझी स्तुती करतो, तुला मान व महिमा असो.!**

**ही आराधना व हा समय तुला समर्पित करतो.**

**सर्व - येशू ख्रिस्ताच्या नावाने मागतो म्हणून तू ऐक. आमेन.**

# स्वागत

**प्रिय भगिनींनो आणि बंधुनो, जगभरातील विविध समुदायातून एकत्र जमलेल्या सर्वांचे हार्दिक स्वागत..!**

**विषय: ''या, मी तुम्हांला विश्रांति देईन''. .... मत्तय ११:२८**

**जे जड ओझ्याने दबलेले व चिंतेने ग्रासलेले त्यांच्यासाठी दिलेले हे एक येशूचे मनापासून, आग्रहाचे आमंत्रण आहे.**

**''या, तुम्ही जसे आहांत तसे'' म्हणजेच आम्हाला त्रासवणाऱ्या सर्व ओझ्यांसह (चिंता, दु:ख, जबाबदारी ) इथे वाहून आणा.. जेणेकरुन आम्हांला शांति मिळेल.**

**नायजेरियातील ख्रिस्ती स्त्रिया आपल्याला हाक मारत आहे.**

**''या आणि आपल्या आत्म्याला विश्रांती द्या'' असा प्रेमळ इशारा देत आहेत.**

**आज आपण एकत्र उपासना करित असताना, एकमेकांची ओझी वाटून घेऊ या ! आपल्या ऐक्यातून नवीन शक्ती मिळवू या ! ख्रिस्ताच्या प्रीतीच्या अलिंगनात एकजूट होवू या ! आपल्यापैकी प्रत्येकाला येथे आपलेपणा लाभे !**

## गीत: उपासनासंगीत क्रमांक १५० - विमल आत्मा ....

## पवित्र शास्त्रपाठ वाचन

**१. स्त्रोत्रसंहिता ९१:१-१६ (प्रतिसादात्मक वाचन)**

**२. शुभवर्तमान - मत्तयकृत शुभवर्तमान ११:२८-३०**

# प्रतिसाद

**आपल्याला येशूच्या शब्दांना प्रतिसाद देण्यासाठी आमंत्रित केले आहे.**

**नेता: थकलेल्यांनो, येशूकडे या !**

**सर्व: आम्ही येतो....**

**नेता: जड ओझे वाहणाऱ्यांनो, येशूकडे या !**

**सर्व: आम्ही येतो....**

**नेता: देव तुम्हांला विश्रांती देईल.**

**सर्व: देव आपल्याला विश्रांती देईल.**

**नेता: येशू त्याचे जूं आपणांवर देतो. ते स्वीकारा !, ते सोईचे व हलकें आहे.**

**सर्व: आम्ही त्यांचे जूं स्वीकारतो....**

**नेता: सौम्य आणि नम्र, लीन मनांच्या व्यक्तीकडून शिका.**

**सर्व: आम्ही शिकण्यासाठी येथे आलो आहोत.....**

**नेता: तुमच्या जिवांस विश्रांती मिळेल.....**

**सर्व: देवाचे आभार मानतो.**

## उपदेश

## विषय: ‘‘या, मी तुम्हांला विश्रांति देईन’’

**मत्तय ११:२८**

# कथा आणि प्रार्थना

**नेता: ख्रिस्तातील प्रिय बहिणी आणि बंधूंनो, आपण आता येशूला आपले ओझे वाहून नेण्यासाठी आणि आपल्या आत्म्याला विश्रांती मिळविण्यासाठी आमंत्रित केले. आता आपण आपले हृदय उघडून आपल्या नायजेरियन बहिर्णींच्या तीन कथा ऐकू या ! या साक्षी, त्यांच्या अनुभवांचे तसेच अनेकांना तोंड द्यावे लागलेल्या संघर्षाचे प्रतिबिंब आहे.**

**या कथा निराशा आणण्यासाठी नाहीत तर त्या दाखवतात की देव सर्वात कठिण परिस्थितीतही कसा विश्रांती देतो हे अनुभवण्यासाठी. या साक्षी, जगभरातील जड ओझे वाहून नेणाऱ्या सर्वांसोबत व प्रार्थनेत आपला आवाज उंचवण्यास आपल्याला प्रेरित करतात.**

**करिंथकरांस पहिले पत्र १२:१२**

**'आपण ख्रिस्तांमध्ये एक शरीर आहोत.' एक अवयव दुखावला तर सर्व अवयवांना सोसावे लागते. पण जेव्हा एखादयाला येशूमध्ये विश्रांती मिळते तेव्हा आपण सर्वजण आनंदी होवू शकतो। जो देव आपल्याला विश्रांती मिळविण्याचे आमंत्रण देतो तोच देव आपल्याला या कथांद्वारे शक्तिशाली, विश्वासू प्रार्थनेसाठी प्रेरित करेल. आपल्याला करूणा आणि आशेने एकत्र बांधेल.**

## बीट्रिसची कहाणी

**(प्रणालीगत दडपशाहीचे ओझे)**

**माझे नाव बीट्रिस. २८ व्या वर्षी माझे पति प्रादेशिक संघर्षात मारले गेले. मी माझा जीवनासाथीच नव्हे तर माझे जीवनातील स्थान व सुरक्षितता सर्व काही गमावले. अचानक तीन मुलांसह मी एकटी पडले. अशा दुनियेचा सामना करीत होते की, ज्याने माझ्याकडे पाठ फिरवली होती.**

**मी आमचे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत गमावले होते. मला समजत नव्हते की, मी माझ्या मुलांना कसे खाऊ घालू ? त्यांच्या शाळेची फि कशी भरु? 'एकटी आई' म्हणून काम शोधण्यासाठी संघर्ष केला.**

माझ्या स्थानिक चर्चने आयोजित कलेल्या विधवांसाठीच्या एका मदत कार्यक्रमांत मी सहभागी झाले. शेकडोंच्या संख्येने विधवा तेथे आल्या होत्या. त्या दिवशी मला जाणवले की मी माझ्या संघर्षात एकटी नाही. माझ्या सर्वात वाईट क्षणांमध्ये मला माझ्या श्रध्देत विश्वास आणि इतर विधवांच्या समुदायात बळ मिळाले.

माझ्या सहकारी विधवांचा दृढनिश्चय आणि विश्वास मला सर्वात जास्त प्रेरणा देत आहे. अडचणी असूनही बरेच जण ख्रिस्ताला समर्पित व वचनबध्द राहतात. येशूला आपला भारवाहक जाणून सांत्वन, समाधान मिळवतात. मी लहान मुलांसह तरूण विधवांना चर्चमध्ये अथकपणे सेवा करताना पाहिले आहे. प्रतिकूल परिस्थितीत ही त्यांचा विश्वास अढळ आहे.

आमच्या समुदायातील एका विधवेने तिचा पती गमावल्यानंतर इतर विधवांना मदत करण्यासाठी एक कार्यक्रम सुरू केला. तिने लोकांना कपडे, तांदूळ आणि पैसे दान करण्यासाठी प्रोत्साहीत केले तिच्या या कार्यामुळे मलाही असेच करण्याची प्रेरणा मिळाली आता माझ्याकडे असलेल्या थोडयाशा संसाधनांचा वापर मी इतर विधवांना मदत करण्यासाठी करते आणि एकत्रितपणे आम्ही अधिक मजबूत बनत आहोत.

या सर्वामध्ये आम्ही आपल्या कुटुंबाशी आणि आपल पतींच्या स्मृतींशी एकनिष्ठ राहतो. पत्नीच्या निधनानंतर पुरूष पुनर्विवाह करतात. परंतु आम्ही आपल्या मुलांना वाढवण्यावर आणि कुटूंबाला एकत्र ठेवण्यावर लक्ष केंद्रीत करतो. हा सोपा मार्ग नाही, परंतु विश्वास आणि समुदयासह आपल्याला पुढे जाण्याची शक्ती मिळते. आपले ओझे भारी आहे ते आम्ही तो येशूच्या चरणी ठेवण्यास शिकत आहोत.

समाजाने मला दूर केले पण ख्रिस्तामध्ये मला नवी ओळख मिळाली. एकत्र राहून आम्ही एकमेकांची ओझी वाहतो. येशूच्या वचनावर ‘विश्रांती’ घेत आहोत.

# मध्यस्थिची प्रार्थना
# बीट्रिसच्या कहाणीला प्रतिसाद

**आपण प्रार्थना करू .**

**नेता: करूणेच्या देवा, आम्हाला माहिती आहे की तू आम्हांला पाहतोस. आम्हांला सर्वांना तोंड द्यावे लागणारी परिस्थिती, प्रसंग व भेदभाव तुला दिसतात. काही जण जास्त काम करतात. कारखान्यात, शेतात, घरांत ज्यांचे शोषण होते. काहींना कुटूंबाचे पोट भरण्यासाठी काम मिळत नाही या सर्वांसांठी हस्तक्षेप कर .....**

**सर्व: हे दयाळू देवा कठीण परिस्थितीतही विश्वासू राहणाऱ्या सर्वांच्या लवचिकतेबद्द्ल आणि तू दिलेल्या साधन संपत्तीबद्द्ल धन्यवाद ! सर्वांच्या कहाणीने आम्हाला प्रेरणा दे ! एक चांगले जग बनविण्यास प्रेरित कर.**

**नेता: प्रिय येशू, तू पीडीतांचे नेहमी स्वागत करतोस. अन्याय व दडपशाहीच्या व्यवस्थेखाली जे लोक त्रस्त आहेत व ओझे सहन करणे खूप जड वाटत असतानांही आम्हांला तुझ्यावर विश्वास ठेवण्याची शक्ती दे.**

**नेत्यांच्या ह्रदयांशी बोल जेणेकरुन ते निष्पक्षता आणि करूनेने राज्य करू शकतील. उपेक्षित असलेल्या सर्वांबद्द्ल त्यांचा दृष्टिकोन आणि कृती बदलण्यासाठी समुदायाच्या ह्रदयांना प्रवृत्त कर.**

**सर्व: पवित्र आत्म्या, आम्हांला पुन्हा भर ! तुझी शक्ती आमच्या समुदायामध्ये ओसंडून वाहत राहू दे. इतरांसाठी आशीर्वाद म्हणून आमचा वापर कर. त्यांच्या स्वत:च्या संघर्षाचा वापर करून त्यांच्या सभोवतालच्या लोकांना आशीर्वाद देणाऱ्या सर्वांकडून आम्हांला प्रेरणा दे! हे प्रेमळ देवा आमची हाक ऐकल्याबद्द्ल आणि आमचे ओझे वाहून नेल्याबद्द्ल धन्यवाद..!**

**सर्व: तुझ्या अढळ प्रेमावर आणि परिस्थिती बदलण्याच्या तुझ्या पराक्रमी शक्तीवर आम्हांला विश्वास आहे. आमेन..**

# जोटोची हकीकत
# (धार्मिक छळाचे ओझे)

**माझे नाव जाटो आहे. मी उत्तर नायजेरियात राहणारी एक ख्रिश्चन आई आहे. दररोज जेव्हा मी माझ्या १४ वर्षाच्या मुलीला अमीनाला शाळेत पाठवते तेव्हा माझे हृदय काळजीने भरून जाते. अमीना, ज्या वयाची आहे त्याच वयाची लियाह शारिबू होती तेव्हा तिचे येथून काही तासांच्या अतंरावर अपहरण झाले .**

**फेब्रुवारी २०१८ मध्ये बोको हारर्न ने दाप्ची येथील एका सेकंडरी स्कूल मधून लियाह शारिबू आणि १०९ दुसऱ्या मुलींचे अपहरण केले होते. लियाह शारिबू ला सोडून सर्व मुलींची सुटका केली. लियाह शारिबू हिने बंदिवासात असतानाही धर्म बदलण्यास नकार दिला म्हणून आठ वर्षापासून बोको हारर्नची ती कैदी आहे.**

**लियाह शारिबूची कहानी मला त्रास देते. जेव्हा-जेव्हा मी माझी मुलगी अमीनाकडे पाहते तेव्हा-तेव्हा मी विचार करते की, ''जर तीच्या जागी माझी मुलगी असती तर?''**

**एक छोटी मुलगी विश्वासात दृढ, कैदेतही ख्रिस्ताला नाकारत नाही. धार्मिक छळाला तोंड देते, छळाच्या सावलीत जगणे तिच्या साठी सोपे नाही. पण येशू आपला छळ करणाऱ्यांसाठी प्रार्थना करायला शिकवतो.**

**दररोज सकाळी जेव्हा मी अमीना सोबत प्रार्थना करते. तेव्हा मी येशूच्या शब्दांची आठवण करून देते. '' जगात तुम्हांला क्लेश होतील. तरी धीर धरा, मी जगांला जिकले आहे'' (योहान १६:३३) आपली ताकद सहज, अरामदायी जीवनाच्या अपेक्षेतून येत नाही, तर ती ख्रिस्त प्रत्येक संकटात आपल्यासोबत चालतो या ज्ञानात रूजलेली आहे.**

**अमीनाला दररोज शाळेत जाताना पाहताना मी तिच्या सुरक्षिततेसाठी नाही तर तिच्या हृदयासाठी देखील प्रार्थना करते. लियाह प्रमाणे तिला विश्वासात दृढ राहण्याची शक्ती मिळावी यासाठी आशा करते. तिला भेटणाऱ्या प्रत्येक**

**मनुष्यात देवाचे स्वरूप पाहण्याची आवड असेल, मग त्यांचा विश्वास काहीही असो.**

**दमातुरूमध्ये एक लहान ख्रिश्चन समुदाय अजूनही लियाह च्या परत येण्यासाठी प्रार्थनेत एकत्र येतो. त्यांची आशा व त्यांचा दृढ विश्वास, मला विश्वास ठेवण्यासाठी, प्रेम करत राहण्यासाठी आणि माझ्या मुस्लिम आणि ख्रिश्चन या दोन्ही शेजाऱ्यांसोबत राहण्यासाठी प्रेरणा देतो.**

**लियाह ची कहाणी आपल्याला या श्रध्देच्या किंमतीची आठवण करुन देते. तिची शक्ती देखील प्रतित करते.**

**या प्रकारे आम्ही परमेश्वरात शांति मिळवतो. द्वेष किंवा असहिष्णुता बाळगून नाही तर छळाच्या वेळीही ख्रिस्ताचे प्रेम आपल्यामधून वाहू देण्याची प्रार्थना करतो. हे एक रोजचे समर्पण आहे, पण ही निवड करताना आपल्याला जाणवते की आपले ओझे खरोखर हलके होते आणि देवामध्ये आपल्याला 'आपली विश्रांती' मिळते.**

# मध्यस्थिची प्रार्थना
# जाटोच्या हकीकतीला प्रतिसाद

**नेता: छळ झालेल्यांच्या देवा आणि श्रध्दाळूंच्या रक्षका, आम्ही जड अंत:करणाने तुझ्यासमोर येतो आणि आपल्या समाजाला त्रास देत असलेल्या पापांची कबुली देतो. जे आमच्या समाजाच्या मानवतेला मुळांपासून नष्ट करण्याचा प्रयत्न करतात, भीती निर्माण करणारी असहिष्णुता पसरवतात, हिंसाचाराला खतपाणी घालणारा द्वेष आणि अन्यायाबदद्लची उदासीनता असणाऱ्या अपराध्यांचे हृदय बदल आणि, त्यांना समेटाचे मार्गदर्शन दे ! प्रियजन गमावण्याच्या भीतीने जगणाऱ्यांना सांत्वन दे !**

**सर्व: न्यायाच्या देवा, आम्ही हिंसाचार पसरवणाऱ्या अतिरेकीपणाविरुध्द आवाज उठवतो आपल्या शेजाऱ्यांपासून वेगळे करणारे प्रत्येक बंधन**

**तोडून टाक. सर्वांच्या हृदयाला स्पर्श कर, त्यांना मानवी जीवनाचे मूल्य आणि शांतीचा मार्ग दाखव.**

**नेता: प्रिय येशू, तुलाही छळ सहन करावा लागला. आम्ही लियाह शरिबू आणि सर्वजण जे विश्वासासाठी दु:ख सहन करतात, त्या सर्वांची आठवण करतो. त्यांना त्यांच्या वाईट काळात शक्ती आणि सांत्वन दे. संकटात विपरीत परिस्थितीत खंबीरपणे उभे राहण्यासाची प्रेरणा दे. तुझ्या प्रेमाचे आणि क्षमेचे जू वाहून नेण्यास आम्हांस मदत कर.**

**सर्व: प्रिय येशू, आमचे मन आणि हृदय नवीन कर. आम्हाला नितीमत्तेत राहण्यास मार्गदर्शन कर, जेणेकरून आम्ही तुझा सन्मान करू आणि इतरांना आशीर्वादित करू शकू. आम्हांला परिवर्तन करण्याच्या तुझ्या सामर्थ्यांवर आमचा विश्वास आहे.**

**नेता: पवित्र आत्म्या, हिंसाचारामुळे विस्थापित झालेल्या,घरे सोडण्यास भाग पाडलेल्या आणि परक्या देशात निर्वासित बनलेल्यांसाठी आम्ही प्रार्थना करतो. जे छळाचा सामना करत आहेत. त्यांनी केवळ बचावांची वाट पाहू नये तर प्रेम आणि क्षमेचे प्रत्येक कृत्य आपल्या जीवनात ख्रिस्ताच्या शाश्वत शक्तीची साक्ष देते हे जाणून आपल्या विश्वासाचे सक्रियपणे पालन करण्यास प्रोत्साहित कर.**

**सर्व: पवित्र आत्म्या, विस्थापित झालेल्या सर्वांना तुझ्या छत्रछायेखाली घे. त्यांच्या गरजा पूर्ण कर. त्यांना सुरक्षिततेसाठी आणि एका नवीन सुरवातीसाठी मार्गदर्शन कर. आमेन.**



# ब्लेसिंगची साक्ष-
# गरिबी आणि निराशेचे ओझे

माझे नाव ब्लेसिंग आहे. गेल्या काही वर्षात मी नायजेरिया बदलताना पाहिला आहे पण आमच्या सर्वांच्या अपेक्षेप्रमाणे नाही. आम्ही प्रगतीचे, आमच्या मुलांसाठी एका चांगल्या जीवनाचे स्वप्न पाहिले होते परंतु त्याऐवजी आम्ही आमचे राष्ट्र गरिबीत, संकटात आणि निराशेत, गर्ततेत खोलवर रूतत चाललेले पहात आहोत.

दररोज हे आमच्या मनावर आणि आत्म्यावर किती परिणाम करते ते पाहतो, जणू आम्ही सर्वजण निराशेच्या चक्रात अडकलो आहोत. आम्ही इतके वेळा निराश झालो आहोत की चांगल्या गोष्टी आमच्या वाट्याला आल्या तरी त्यावर विश्वास ठेवण्यास घाबरू. नायजेरीयात आम्ही चंागल्या गोष्टी होवू शकतात यावर विश्वास ठेवणे आम्ही सोडून दिले आहे.

सरकार नागरिकांवर नाही तर स्वत:वर लक्ष केंद्रित करत असल्याचे दिसते. तांदूळ-एक मुख्य अन्न आता अनेक कुटूंबासाठी एक चैनीची वस्तू बनली आहे. आमचे तरूण चंागले आणि क्षमतांशी परिपूर्ण काम शोधू शकत नाहीत. निराशेने बरेच जण आत्महत्या करत आहेत. काही हताश होवून गुन्हेगारीकडे वळतात, अपहरण, दरोडा किंवा वेश्याव्यवसाय करतात. नायजेरिया संसाधनांनी समृध्द असलेले राष्ट्र परंतु नेतृत्व आणि आशेने कमकुवत आहे. पण या निराशेच्या काळातही मला प्रकाशाचे किरण दिसतात. माझी शेजारीण ग्रेसचे विचार येतात. एकाच वर्षी नोकरी व पति दोघांनाही ग्रेस गमावून बसली. परंतु हार न मानता तिने घरगुती साबण विकण्याचा एक छोटासा व्यवसाय सुरू केला. त्यामुळे ग्रेसला रोजचे जेवण व मुलांना शाळेत पाठविता आले.

ग्रेस मला अनेकदा सांगते, ''ब्लेसिंग, आपण फक्त सामना करत नाही, तर आपण विश्वासावर जगतो''. तिचे शब्द मला बायबल मधील ''विश्वासू मनुष्य आपल्या विश्वासाने जगेल'' व ''जे लोग निराश आहेत ते उंचावले जातील'' या वचनाची आठवण करून देतात म्हणूनच आपण पुढे जात राहतो. एक दिवस वादळ दूर निघून जाईल व देव आपल्यासाठी दुसरे दार उघडेल यावर आम्ही विश्वास ठेवतो.

# मध्यस्थिची प्रार्थना
# (ब्लेसिंगच्या साक्षीला प्रतिसाद)

नेताः पवित्र देवा, सर्वांचा पालनकर्त्या आंम्ही सर्व कठीण परिस्थितीशी सामना करीत मार्ग काढणाऱ्या सर्वांसाठी धन्यवाद व स्तुती करतो.

सर्वः जीवनदात्या, जीवनाच्या ओझ्यांमुळे थकलेल्या सर्वांना शक्ती व सांत्वन दे. जे मदत करू शकतात त्यांच्या हृदयांना मार्गदर्शन करत राहा.

नेताः प्रिय येशू आरोग्य देणाऱ्या, तुझ्या उपस्थितीत अशा लोकांना आणत आहोत की जे गरिबी, ताणतणाव आणि दैनंदिन जीवनात मानसिक रोगाने त्रस्त असतात. देवा त्यांना तू दाखवून दे की जीवनाची मूल्ये मौल्यवान आहेत. सर्वांचा आदर करणारा व त्यांची काळजी घेणारा समाज निर्माण करण्यास आम्हांला मदत कर.

सर्वः प्रिय येशू, तू आम्हांला सर्व ओझ्यांसह तुझ्याकडे येण्यास बोलावले आहे. आमची काळजी तुझ्यांवर टाकण्यास आणि हे ओझे हलके करण्यास आम्हांला मदत कर.

नेताः पवित्र आत्म्या, संकटाच्या वेळी आमचे सांत्वन करणारा हो ! अशक्य वाटेवरून पुढे जात राहण्यासाठी विश्वास दे ! पुढे जाण्याचा कोणताही मार्ग दिसत नसेल तेव्हा आमचा मार्गदर्शक हो !

सर्वः आंम्हाला इतरांसाठी प्रकाश बनण्यास तयार कर. आशा निर्माण करण्यास आणि शक्य तितका मदतीचा हात देण्यासाठी मदत कर. ''मी तुला कधीही सोडणार नाही, मी कधीही तुला त्यागणार नाही'' (इब्री १३:५) हया तुझ्या सांत्वनदायक वचनावर विश्वास ठेवतो.

आमेन.

# दानार्पण

**नेता: आपण आपले दान अर्पण करू या ते इतरांचे ओझे हलके करण्याच्या वचनबध्दतेचे प्रतीक असू दया.**

## गीत:उपासनासंगीत ५११.. ख्रिस्तापर्णमस्तु ...
## (दानार्पण घेण्यात यावे)
## दानार्पण प्रार्थना

**सर्व: सर्वसमर्थ देवा, सर्व काही तुझ्यांपासून प्राप्त होते. तुझ्याच हातून प्राप्त झालेले आम्ही तुला देत आहोत. ही दाने-अर्पणे आम्ही तुझ्या नावाच्या गौरवाकरीता व महिलांच्या सबलीकरणांच्या प्रकल्पासाठी सादर करतो त्यांच्या तू स्वीकार कर.येशू ख्रिस्त आमचा प्रभु याच्याद्वारे आमेन**

## वचनबध्दता
## प्रार्थनापूर्वक कार्य करण्यासाठी

**नेता: या उपासनेद्वारे नायजेरिया आणि जगभरातील आमच्या बहिर्णीनी वाहून घेतलेल्या ओझ्याबदद्ल माहिती मिळाली आहे. आम्ही एकत्रितपणे प्रार्थना केली आहे.**

**जागतिक प्रार्थना दिनाचे ब्रीदवाक्य-'माहितीपूर्ण प्रार्थना आणि प्रार्थनापूर्वक कृती.' जे आपल्याला आठवण करून देते की, आपल्या प्रार्थना आपल्याला जगाच्या परिवर्तनासाठी कृतीकडे घेवून जातील. आशा आणि विश्रांतीची आस असलेल्या जगात ख्रिस्तांचे हात आणि पाय होण्याची आपल्या वचनबध्दतेची पुष्टी करून आपण एकत्रितपणे या आवाहनला प्रतिसाद देवू या !**

**नेता: ओझ्याने भरलेल्या जगांत आपल्याला आपली 'आशा' कुठे मिळेल?**

**सर्व: ख्रिस्तामध्ये, जो आपला सर्व भार वाहतो.**

**नेता: आपण कठीण परिस्थितींना कसा प्रतिसाद देतो?**

**सर्व: सर्व वादळे निघून जातील असा विश्वास ठेवून आपण लवचिक राहतो.**

**नेता: अनिश्चित काळात आपण आपला विश्वास कोणावर ठेवायचा?**

**सर्व: जीवनदाता आणि सर्वांचा पालनकर्ता देवावर.**

**नेता: आपल्या सभोवतालचे लोक थकलेले आणि ओझ्याने दबलेले असताना आपण काय करावे?**

**सर्व: ख्रिस्त जसा आपला भार वाहतो तसा तुम्हीही एकमेकांचे भार वहावे.**

**नेता:आपण पुढे जात असताना आपल्याला कृती करण्याचे आवाहन काय आहे?**

**सर्व: माहितीपूर्ण प्रार्थनेत - प्रार्थनापूर्वक कृतीद्वारे जगणे.**

**नेता: आपण ख्रिस्ताच्या सामर्थ्याने पुढे जाऊ या.**

**सर्व: जगांत प्रकाश होण्यासाठी विश्वास, आशा आणि प्रेम घेवून जगू या.**

# प्रभुची प्रार्थना

# आशिर्वाद

**सर्व: आपण ख्रिस्ताचे जीवंत साक्षीदार म्हणून पुढे जाऊ या. आपल्याला भेटणाऱ्या सर्वांना 'देवाची विश्रांती' देवू या. केवळ देवामध्ये स्वत:ची विश्रांती न शोधता इतरांसाठी त्या दैवी विश्रांतीचे माध्यम बनू या.**

**पवित्र आत्म्या, आमच्या मनांची दारे उघड. आम्ही एक दुसऱ्यांसाठी आशीर्वादित होवू असे तू कर. आमेन**

## गीत : उपासनासंगीत ७९१- ख्रिस्त, पवित्र, शांतीस..

************

## भाषांतर

## मिसेस्. उज्वला अनिल रेड्डी

**सी. एन्. आय्. वूमन्स फेलोशिप फॉर ख्रिश्चन सर्व्हिस**

**चर्च ऑफ नॉर्थ इंडिया**

**कन्व्हेनर**

**फेलोशिप ऑफ लीस्ट कॉइन**

# जागतिक प्रार्थना दिन २०२७
# शताब्दी महोत्सव
## (१९२७-२०२७)

पुढील वर्षी मार्च २०२७ मध्ये एक चळवळ म्हणून जागतिक प्रार्थना दिन १०० वर्षे पुर्ण करेल.

ऑस्ट्रेलिया मध्ये १९२७ मध्ये पहिली जागतिक प्रार्थना दिनाची प्रार्थना आयोजित करण्यात आली. क्वीन्सलॅंड आणि न्यू साऊथ वेल्समध्ये प्रार्थनाचे आयोजन केले जात होते.

२०२७ हे वर्ष आभार आणि उत्साहाचे वर्ष असेल.

२०२७ मध्ये होणाऱ्या शताब्दी सेवेसाठी स्थानिक आणि जगभरातील सर्व विशेष तयारीसाठी प्रार्थना करा.

(WDPIC) जागतिक प्रार्थना दिन २०२७ आंतरराष्ट्रीय समिती याचे आयोजन करित आहे.

## विषय: ‘‘न्याय आणि शांततेसाठी संघटीत’’

## Theme: “United in prayer for Justic and Peace.

WORLD DAY OF PRAYER

Informed Prayer, Prayerful Action

# माहितीपूर्ण प्रार्थना - प्रार्थनापूर्वक कृती